शिवसेना
उद्धव बाळासाहेब ठाकरे

# स्थानीय लोकाधिकार समिती महासंघ




# लोकाधिकार

**५० सुवर्ण महोत्सवी वर्ष**

## स्थानीय लोकाधिकार समिती महासंघ - एक धगधगती चळवळ

# अधिवेशन

## २०२४

दिनांक: रविवार, ११ फेब्रुवारी २०२४ । सकाळी ९ वा.

शिवसेना
(उद्धव बाळासाहेब ठाकरे)

# स्थानीय लोकाधिकार समिती महासंघ

**अध्यक्ष** - खा.अनिल देसाई, शिवसेना नेते
**कार्याध्यक्ष** - आ.विलास पोतनीस
**कार्याध्यक्ष** - आ.सुनील शिंदे
**सरचिटणीस** - श्री.प्रदीप मयेकर

**सल्लागार समिती**

सर्वश्री अरुण नाबर, रमाकांत साटम, जयंत निमसुडकर, जी.एस.परब, सुरेश नार्वेकर, रवि कुवेसकर, राजन तुळसकर, लक्ष्मीकांत पाटील, हेमंत मोरे

**वरिष्ठ उपाध्यक्ष**

सर्वश्री चंद्रकांत वैद्य, राजीव जोशी, वामन भोसले, अजित सुभेदार

**उपाध्यक्ष**

सर्वश्री प्रदीप बोरकर, हेमंत गुप्ते, अनिल चव्हाण, शरद जाधव, दिलीप जाधव, राजेश मतकरी, जयवंत मकाजी, रमेश गवळी, उल्हास बिले, सुरेश शिंदे, शरद एक्के, तुकाराम गवळी, विलास घुगरे, प्रविण हाटे, किरण फडणीस, नितिन रेगे, प्रसाद सामंत, विजय अडसुळे, रमाकांत रात, सुरेश राणे, राजा कांबळी, प्रदीप पाटील, किरण पिंपुटकर, श्रीमती निलिमा भुर्के, श्रीमती माया परांजपे

**संघटन सचिव**

सर्वश्री उमेश नाईक (प्रशिक्षण वर्गप्रमुख), दिनेश बोभाटे

**चिटणीस**

सर्वश्री अजय माने, मिलिंद घनकुटकर, राजेश सकपाळ, संजय शिर्के, संजय जोशी, पंकज केरकर, ललीत साने, अरुण दुबे, किरण शिंदे, विनोद खोब्रागडे, विजय शिरोडकर, दीपक मोरे, शैलेश नेरुरकर, समीर तळपदे, विनायक शेलार, संजय वारके, संग्राम मालवणकर, अनंत सावंत, हेमंत रासम, विकास मोरे, सुधीर वैद्य, संदीप गावडे, विजय भाऊसाहेब कदम, विजय कदम, संजय भगते, दिनेश भोसले, श्याम बिस्त, संजय शेर्लेकर, श्रीराम विश्वासराव (प्रशिक्षण वर्गप्रमुख), बाळासाहेब कांबळे, जितेंद्र देशमुख, जितेंद्र लोखंडे, अरुण कोळी, कृष्णा घाटकर, राजेंद्र राऊत, संजय डफळ, श्रीमती शर्वरी शेट्ये, श्रीमती श्वेता मालवणकर, श्रीमती श्वेता रायकर, श्रीमती नूतन समेळ, श्रीमती स्वाती गद्रे, श्रीमती हर्षला परब, श्रीमती अक्षया फोंडके, श्रीमती कल्याणी सावंत, श्रीमती स्मिता तेंडुलकर

**खजिनदार**

श्री.अजय गोयजी

**सहखजिनदार**

श्री.विलास जाधव (प्रशिक्षण वर्गप्रमुख)

**प्रशिक्षण वर्ग समिती**

सर्वश्री नंदू राणे, सचिन लोके, राघवेंद्र चाटी, हेमंत सावंत

**कार्यालयप्रमुख**

सुधाकर नर

## लोकाधिकारचा निर्धार - पुन्हा विधानभवनावर भगवा !

- खा. अनिल देसाई - शिवसेना नेते
अध्यक्ष, स्थानीय लोकाधिकार समिती महासंघ

**स्थानीय लोकाधिकार समिती महासंघाची स्थापना १९७४ साली झाली. मराठी अस्मिता, अभिमान आणि अस्तित्वासाठी लढणाऱ्या लोकाधिकार चळवळीचा या वर्षी सुवर्ण महोत्सव साजरा करताना आनंदच होत आहे. तेव्हा चळवळीचे सिंहावलोकन करणे क्रमप्राप्त ठरते.**

१९ जून १९६६च्या शिवसेनेच्या स्थापनेपासून मराठी बेरोजगारांना नोकऱ्या देणे हा शिवसेनेच्या संघटनेचा महत्त्वाचा भाग होता. त्यासाठी शिवसेना शाखा-शाखांवर 'रोजगार विनिमय केंद्र' चालवली जायची. त्या कामाची जबाबदारी शिवसेनाप्रमुखांनी राम दांडेकर, अरुण जोशी, दिवाकर रावते, पालेकर यांच्यावर सोपविली होती. साठच्या दशकात परंप्रातिय उद्योगपतींकडून शिक्षण असूनही बहुजन समाजातील मुलांना श्रमिक क्षेत्रातील कामे देण्यात येत होती. शिवसेनेने केलेल्या संघर्षामुळे श्रमिक क्षेत्रात मराठी तरुणांचा टक्का बराच वाढला गेला. तरीही त्यात समाधानी रहाण्यासारखी परिस्थिती नव्हती. कारण देशातील ७५ टक्के बँकांची मुख्य कार्यालये मुंबईत असतानाही त्यात मराठी टक्का अत्यल्प होता. केंद्रीय आस्थापने, बँका व विमा कंपन्या या महत्त्वाच्या 'व्हाईट कॉलर' क्षेत्रात ८० टक्के जागा अमराठी लोकांनी व्यापल्या होत्या. परस्पर संगनमताने येथे भरती केली जायची. मराठी माणसाला याचा सुगावाही लागायचा नाही. यासाठी शिवसेनेने लढ्याचे पाऊल उचलले. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी या अन्यायाला लोकाधिकारच्या माध्यमातून वाचा फोडली.

या सर्व केंद्रीय आस्थापनात, बँकांत व विमा कंपन्यात ८० टक्के जागा मराठी माणसाला मिळायला हव्यात यासाठी पांढरपेशा उच्चशिक्षित नोकऱ्यांवर नजर ठेवत जागल्याची भूमिका वठविण्यासाठी १९७३ साली मा. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी 'स्थानीय लोकाधिकार समिती' स्थापन करण्याचा निर्णय घेतला.

सुरुवातीस बऱ्याच आस्थापनात स्थानीय लोकाधिकार समितीची स्थापना वंदनीय शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या हस्ते झाली. पहिल्या दोन वर्षात १) न्यु इंडिया इन्शुरन्स कंपनी २) स्टेट बँक ऑफ इंडिया ३) बँक ऑफ अमेरिका ४) फर्स्ट नॅशनल सिटी बँक ५) ए.जी. ऑफिस ६) शिपिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया ७) रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ८) सेंट्रल बँक ऑफ इंडिया यासारख्या आस्थापनात समितीने आपले अस्तित्व दाखवले. अमराठी लॉबीच्या दबावाखाली घुसमटलेला पांढरपेशा मराठी कर्मचारी वर्ग समितीचे व्यासपीठ मिळताच हत्तीचे बळ मिळाल्यासारखा वावरू लागला. आपले हक्क मिळविण्यासाठी समितीचा विस्तार करायला हवा, हेच प्रमुख उद्दिष्ट समोर ठेऊन सर्व मराठी कर्मचारी एकत्र येऊ लागले, एकजूट झाले.

ऑक्टोबर १९७३ मध्ये रिझर्व्ह बँकेतील नोकरभरतीत मराठी माणसाला डावलले जात होते. त्या विरुद्ध रिझर्व्ह बँकेतील रामराय वळंजु, गजानन कीर्तिकर, सुर्यकांत महाडिक, विलास पोतनीस, सुभाष रणदिवे आदी मंडळी लढत होती. रिझर्व्ह बँकेत अधिकृतपणे समिती स्थापन झाली नव्हती. परंतु या नेत्यांच्या एकजुटीमुळे लढ्याला यश मिळाले आणि ८० टक्के मराठी तरुणांची नोकरभरती झाली. रिझर्व्ह बँक एम्पलॉईज असोसिएशनच्या माध्यमातून-पुढाकाराने डिसेंबर १९७३ मध्ये रिझर्व्ह बँक स्थानीय लोकाधिकार समितीची अधिकृत स्थापना झाली.

मग स्वतःला नोकरी असताना सर्व धोके पत्करून इतर मराठी माणसांना नोकरीत प्राधान्य मिळवून देण्यासाठी लढा देणारे कार्यकर्ते अशी स्थानीय लोकाधिकार समितीच्या कार्यकर्त्यांची एक सेवाभावी मराठी रोजगार संवर्धन करणारी ओळख निर्माण झाली. मग हळूहळू अनेक आस्थापनातून समितीचे झेंडे डौलाने फडकू लागले. स्थानीय लोकाधिकार समितीचा वाढता विस्तार पाहता शिवसेनाप्रमुखांनी या सर्व समित्यांमध्ये

एकसूत्रता आणण्यासाठी वेगवेगळ्या आस्थापनांमधील समित्यांचा एक 'महासंघ' निर्माण करण्याचा निर्णय घेतला. केंद्रीय आस्थापनांत मराठी माणसांना ८० टक्के नोकऱ्या मिळाल्या पाहिजेत. या स्थानीय सूत्रात कायद्याच्या भाषेत पटवून देण्यासाठी हे समीकरण गरजेचे होते.

शनिवार दि. १४ डिसेंबर १९७४ रोजी वंदनीय शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी 'स्थानीय लोकाधिकार समिती महासंघाची' घोषणा केली. त्या कार्यक्रमात महासंघाची रुपरेखा स्पष्ट करताना शिवसेनाप्रमुख म्हणाले, ''परप्रांतीयवादाचा धुमाकूळ यापुढे मराठी तरुण सहन करणार नाही. मराठी बांधवाच्या आड येणाऱ्यांच्या कानाखाली आवाज काढणे भाग पडेल. यापुढे ८० टक्के नोकऱ्या मराठी माणसाला मिळाल्याच पाहिजेत.'' या कार्यक्रमात स्थानीय लोकाधिकार समिती महासंघाच्या अध्यक्ष पदी सुधीर जोशी यांच्या नियुक्तीची घोषणाही करण्यात आली.

### तीव्र आंदोलने, उग्र निदर्शने ! भूमिपुत्रांच्या हक्कासाठी लोकाधिकारचा रुद्रावतार !!

लोकाधिकारची चळवळ फोफावत होती. तेव्हा काही अमराठी उच्च पदस्थ अधिकारी मंडळींना हे रुचत नव्हते. ते चळवळीत अडथळा निर्माण करू लागले. तेव्हा शिवसेना स्टाईलने धडा शिकवायलाही लोकाधिकारच्या 'व्हाईट कॉलर' कार्यकर्त्यांनी मागे पुढे पाहिले नाही. लोकाधिकारच्या प्रखर आंदोलनाने परप्रांतीय अधिकाऱ्यांचे धाबे दणाणले! चळवळीच्या धगधगत्या अग्निकुंडात मराठी विरोधकांची राख झाली. लोकाधिकार चळवळ मराठी माणसांच्या मना-मनात रुजली.

**महासंघाची कार्यपद्धती :** एखाद्या आस्थापनेमध्ये मराठी लोकांवर नोकरभरती, बढती, बदलीमध्ये अन्याय होतो असे निदर्शनास आल्यास त्या आस्थापनेमधील व्यवस्थापनाला, होणारा अन्याय पत्राद्वारे महासंघ कळवितो व अन्यायाचे निराकरण करण्याची मागणी करतो. बहुतेक वेळा या पत्राची पोच दिली जाते व सदर व्यवस्थापन महासंघाला चर्चेसाठी पाचारण करते. या बैठकीत ८० टक्के मागणी समर्थपणे मांडली जाते. ८० टक्के नोकरभरतीची मागणी ही महासंघाची केवळ एकच मागणी नसून मराठी लोकांच्या हक्काच्या इतरही मागण्या बैठकीत मांडल्या जातात त्या अशा...

नोकर भरतीसंबंधीच्या जाहिरातील निविदा, सूचना सर्व जिल्हा पातळीपर्यंतच्या प्रमुख मराठी दैनिकांमध्ये केली पाहिजे. मराठी लोकांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी मुलाखती घेणाऱ्यांमध्ये मराठी अधिकारी असला पाहिजे. प्रशासकीय व कामगार कल्याण अधिकारी मराठी असले पाहिजेत. रिक्रुटमेंट व पर्सनल विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी मराठी असले पाहिजेत. कोणत्याही मराठी माणसाची नियमबाह्य किंवा अन्यायकारक बदली करू नये. कंपनीने आऊटसोर्सिंगची सर्व कामे मराठी ठेकेदारांनाच दिली पाहिजेत. उमेदवाराच्या मुलाखतीच्या वेळी उमेदवारास मराठी दैनिक वाचावयास सांगून त्याचे मराठीचे ज्ञान अजमावून पाहिले पाहिजे. रिक्त पदासंबंधी माहिती मराठी उमेदवारांपर्यंत पोहोचू न देण्यासाठी व्यवस्थापन एक-दोन इंग्रजी दैनिकांमध्येच आपली जाहिरात प्रसिद्ध करते किंवा महाराष्ट्राव्यतिरिक्त इतर राज्यांच्या दैनिकांमध्ये ही जाहिरात प्रसिद्धीला देते. अशा गोष्टी महासंघ पत्र पाठवून व्यवस्थापनाच्या निदर्शनास आणून देतो आणि महाराष्ट्रातील मराठी दैनिकांत नोकरभरतीच्या जाहिराती छापण्यास भाग पाडते.

**महासंघाचे प्रशिक्षण कार्यक्रम :** वर सांगितलेल्या मागण्या मान्य करून घेताना चर्चेच्या वेळी नेहमी एक लंगडी सबब पुढे केली जात होती की, रिक्त पदे भरण्यासाठी योग्य मराठी उमेदवार उपलब्ध नाहीत आणि जे आहेत ते स्पर्धात्मक परीक्षेत टिकू शकत नाहीत. मग शिवसेनाप्रमुखांनी मराठी तरुणांना योग्य ते प्रशिक्षण देण्याचा निर्णय घेतला आणि हा उपक्रम सुरू केला तो आजतगायत सुरू आहे. यासाठी महासंघाने कंबर कसून अशा उमेदवारांना परिपूर्ण प्रशिक्षण देऊन स्पर्धात्मक परीक्षा यशस्वीपणे उत्तीर्ण होण्यास तयार केले. गेल्या ५० वर्षांच्या काळात अशा जवळजवळ तीन लाख मराठी उमेदवारांना विविध ठिकाणी आयोजित केलेल्या प्रशिक्षण वर्गामधून लेखी परीक्षेसाठी व मुलाखतीसाठी मार्गदर्शन केले. हे प्रशिक्षण वर्ग शरद एक्के, जी.एस.परब, अरुण नाबर, शरद पवार, श्रीराम विश्वासराव, उमेश नाईक, विलास जाधव, सुधाकर नर

आदींच्या देखरेखीखाली ठरवले जातात. विमा कंपनीतील कारकून व अधिकारी भरती प्रशिक्षण वर्ग दिनेश बोभाटे यांच्या मार्गदर्शनाखाली भरवले जातात.

केवळ अर्ज-विनंत्यांच्या मवाळ मार्गाने जाण्यात लोकाधिकार समितीला स्वारस्य नव्हते. प्रसंगी ‘हक्का’साठी दोन हात करण्याची व रणांगण गाजविण्याचीही तयारी होती. त्या मार्गाने समितीच्या कार्यकर्त्यांनी अनेक आंदोलने केली, पोलिसांच्या लाठ्या खाल्ल्या. त्यावेळी खाल्लेल्या लाठ्यांचे वळ कार्यकर्त्यांच्या पाठीवर आजही दिसतील. कित्येक कार्यकर्त्यांवरील खटले आजही चालू सुरू आहेत. मात्र अशा गोष्टींमुळे आणि कृतीमुळे कार्यकर्ता खचला नाही की त्याने कोणत्याही परिणामाची तमा बाळगली नाही. शिवसेनेच्या मुशीत तयार झालेल्या स्थानीय लोकाधिकार समितीने अनेक संकटात, वादळात आणि आक्रमणातही मराठी अस्मितेचे निशाण फडकवीत ठेवले आहे. ही चळवळ थोडी जरी शिथिल झाली असती तर दिल्लीश्वराच्या मेहेरबानीवर मुंबईत आलेल्या अमराठी अधिकाऱ्यांच्या टोळीने मराठी माणसांना नोकरीच्या हक्कावर तुळशीपत्र ठेवायला भाग पाडले असते. परंतु शिवसेनेच्या लोकाधिकार समितीने आजवर हे होऊ दिलेले नाही आणि भविष्यातही हे होऊ देणार नाही. लोकाधिकार चळवळीचे हे असिधाराव्रत यापुढेही अखंड चालूच राहाणार आहे.

लोकाधिकार महासंघातर्फे महाराष्ट्राचे दोन गौरवोत्सव साजरे केले जातात. एक कवीवर्य वि. वा. शिरवाडकर उर्फ ‘कुसुमाग्रज’ यांचा २७ फेब्रुवारी हा जन्मदिन ‘मराठी भाषादिन’ म्हणून मोठ्या दिमाखाने गौरवाने साजरा केला जातो. तर दुसरा छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्याचे व त्यागाचे दर्शन घडविणारे ‘शिवराय संचलन’ मोठ्या दिमाखदारपणे व गौरवाने साजरा केले जाते.

### सुशिक्षित कार्यकर्त्यांचे मोहोळ

लोकाधिकार समिती महासंघाचे कार्यकर्ते म्हणजे सुशिक्षित कार्यकर्त्यांचे मोहोळ होय. वंदनीय शिवसेनाप्रमुख श्रीमान बाळासाहेब ठाकरे यांनी शिवसेना अधिवेशन असो अथवा कुठल्याही निवडणुका असो. त्याच्या नियोजनाची, प्रचाराची आणि प्रसिद्धीची जबाबदारी वेळो-वेळी लोकाधिकार समिती महासंघाच्या कार्यकर्त्यांवर टाकली. या जबाबदारीला पूर्ण न्याय देण्याचा प्रयत्न प्रामाणिकपणे लोकाधिकार कार्यकर्त्यांनी केला. त्यासाठी महाराष्ट्रात सर्वत्र महासंघाचे कार्यकर्ते अहोरात्र मेहनत घेतात, अपार कष्ट करतात. तर शिवसेनापक्षप्रमुख मा. उद्धवजी ठाकरे यांनी लोकाधिकार समिती कार्यकर्त्यांना जनसेवेची योग्य संधी दिली.

स्थानीय लोकाधिकार समिती महासंघामुळे मुंबईतील उच्चभ्रू मंडळींना, सुशिक्षित वर्गाला कळले की, शिवसेनेची मंडळी बुद्धीजीवी कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांवर लढू शकतात. त्यांच्यासाठी आंदोलने करू शकतात. व्यवस्थापनाशी अस्खलित इंग्रजीतून संभाषण करू शकतात. कामगार-कर्मचारी यांच्यासाठी असलेल्या सर्व कायद्यांची जाण ठेऊन कायदेशीर लढा देऊ शकतात. वेळ प्रसंगी कोर्ट-कचेऱ्या करून कायद्याच्या आधारे न्याय मिळवून देऊ शकतात. मराठी कर्मचाऱ्यांमध्ये आलेला हा विश्वास पुढे स्थानीय लोकाधिकार समितीचा मोठा आधार ठरला. या लोकाधिकारच्या सुशिक्षित कार्यकर्त्यांच्या मेहनतीमुळे गेली ३५ वर्ष मुंबई पदवीधर मतदार संघावर शिवसेनेचा भगवा फडकतो आहे आणि भविष्यातही फडकतच राहणार.

### कॉन्ट्रॅक्ट पद्धती भरती विरोधात लढा

सध्या बँका, विमा कंपन्या, तेल कंपन्या आदी सार्वजनिक क्षेत्रात नोकरभरती फारच कमी प्रमाणात होत आहे. गेल्या दहा वर्षात कॉन्ट्रॅक्ट पद्धतीवर नोकरभरती केली जात आहे. उद्योगक्षेत्र, सार्वजनिक क्षेत्रात या कॉन्ट्रॅक्ट पद्धतीमुळे असंतोष वाढला आहे. कामगार व कर्मचाऱ्यांना किती दिवस नोकरी टिकेल याची शाश्वती नसते. हा असंघटित वर्ग इतर सुविधांपासूनही वंचित राहिला आहे. त्यांच्यावर व्यवस्थापन सतत अन्याय करीत असते. या कॉन्ट्रॅक्ट लेबर भर्ती विरोधात, अन्यायाविरोधात लोकाधिकार समितीने वेळोवेळी आवाज उठवला आहे. न्याय्य मागणीसाठी लढा दिला आहे.

लोकाधिकार महासंघ कॉन्ट्रॅक्ट लेबरसाठी व्यवस्थापनाकडे नेहमी न्याय्य मागण्या करते. ज्या आस्थापनात अनिवार्य असेल तिथेच कॉन्ट्रॅक्ट पद्धत लागू करा. कर्मचाऱ्यांना योग्य-कायम स्वरुपाचा मोबदला द्या. अल्पकाळासाठी नोकरी न देता २५ ते ३० वर्षे कायम नोकरीची हमी द्या. कायम कर्मचाऱ्यांना ज्या सुविधा आहेत, त्या या कॉन्ट्रॅक्ट कर्मचाऱ्यांनाही लागू करा. त्यांचे भविष्य सुरक्षित राहण्यासाठी कायदे करा. या सर्व मागण्या आस्थापनाकडेच नव्हे, तर राज्य व केंद्र सरकारकडे स्थानीय लोकाधिकार समिती महासंघाने केल्या आहेत. त्याचा पाठपुरावाही करीत आहे.

### मुख्यमंत्रीपदाचा काळ, महाराष्ट्राचा 'सुवर्णकाळ'!

शिवसेनापक्षप्रमुख मा. उद्धवजी ठाकरे यांच्या अडीच वर्षांच्या मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळात महाराष्ट्रातील सर्व घटकांना योग्य न्याय देण्याचा त्यांनी प्रयत्न केला. तो काळ खऱ्या अर्थाने महाराष्ट्राचा 'सुवर्णकाळ' होता.

✷ शिवसेना, राष्ट्रवादी आणि काँग्रेस या तीन पक्षांच्या महाविकास आघाडीचे प्रथम मुख्यमंत्री म्हणून शिवसेनापक्षप्रमुख मा. उद्धवजी ठाकरे यांनी २८ नोव्हेंबर २०१९ रोजी शिवतीर्थावर लाखोंच्या उपस्थितीत शपथ घेतली. ✷ मा. मुख्यमंत्री उद्धवजी ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली महाविकास आघाडी सरकारला अडीच वर्षांचाच अल्पकाळ लाभला आणि तरीही त्याकाळात महाराष्ट्रातील सर्व समाजघटकांना त्यांनी न्याय देण्याचा प्रयत्न केला. ✷ महाराष्ट्रातील तीस लाखांपेक्षा जास्त शेतकऱ्यांना कर्जातून मुक्त करण्यासाठी त्यांच्या बँक खात्यात थेट रक्कम जमा केली. ✷ १० रुपयात जेवणाच्या थाळीची 'शिवभोजन केंद्रे' सुरू केली. ✷ हजारो गिरणी कामगारांना त्यांच्या हक्काची घरे, पोलिसांना हक्काची घरे आणि बी. डी. डी. चाळीच्या पुर्नविकासाचा निर्णय घेतला. ✷ राज्यातील सर्व आस्थापनात ८० टक्के भूमिपुत्रांना नोकरीसाठी सक्तीचा कायदा केला. ✷ महाराष्ट्रातील सर्व शाळात १२वी पर्यंत मराठी भाषा अनिवार्य केली. ✷ स्थानिक स्वराज्य संस्थांतील सर्व कारभार मराठीतून करण्याचा आणि आस्थापनावरील पाट्या मराठीतूनच असाव्यात असा आदेश काढला आणि अमंलबजावणीसाठी आग्रही राहिले. ✷ मराठीला लवकरच अभिजात भाषेचा दर्जा मिळावा म्हणून केंद्र सरकारकडे फक्त पाठपुरावा करून न थांबता लोकचळवळ उभारली. ✷ मुंबईत मराठी भाषा भवनाचे भूमिपूजन केले. ✷ मुंबई पश्चिम उपनगरात मेट्रो रेल्वेचा एक टप्पा सुरू केला. ✷अडीच वर्षांच्या कार्यकाळात दोन वर्षे कोरोना महामारीचा मुकाबला करण्यात गेली. जेव्हा पाहिजे तेव्हा निर्बंध घट्ट करून अंमलबजावणी केल्यामुळे महाराष्ट्र सरकारला कोरोना महामारी नियंत्रणात ठेवण्यात यश आले. ✷ 'माझे कुटुंब, माझी जबाबदारी' हे अभियान राबविले. ✷ कोरोनाच्या संकटातही चौफेर आर्थिक आणि औद्योगिक विकास केला. ✷ कोरोनाच्या संकटाचे संधीत रुपांतर करून उद्धवजी ठाकरे यांनी कोरोना काळातही राज्याचे अर्थचक्र थांबू दिले नाही. उद्योगधंदे सुरूच ठेवले. ✷ कोरोना काळात रुग्णालये, खाटा, आय. सी. यू., व्हेंटिलेटर्स, औषधे, रक्तपुरवठा, रुग्णवाहिका आदिंची कमतरता भासू दिली नाही. स्वतः जातीने लक्ष दिले म्हणून महाराष्ट्रात कोरोना मृत्युंची संख्या आटोक्यात राहिली. या उलट भाजपच्या गुजरात आणि उत्तर प्रदेश राज्यात हजारो प्रेते नदीत टाकून माणुसकीचे हीन दर्शन भाजपने घडवले. ✷ कोरोना काळातील त्यांच्या कामगिरीचे कौतुक पंतप्रधान, सर्वोच्च न्यायालय आणि जागतिक आरोग्य संघटनांनी केले. ✷ देशातील खासगी संस्थांनी वेळोवेळी केलेल्या सर्वेक्षणात पहिल्या पाच उत्कृष्ट मुख्यमंत्र्यांच्या यादीत उद्धवजी ठाकरे यांचे नाव चार वेळा होते. ✷ परंतु उद्धवजींचे हे कौतुक विरोधकांच्या डोळ्यात खुपत होते आणि त्यांनी महाविकास आघाडी सरकार अस्थिर केले. ✷ २९ जून २०२२ रोजी उद्धवजी ठाकरे यांनी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा त्याग केला. एका सुशिक्षित, सुसंस्कृत, सालस मुख्यमंत्र्याला स्वार्थी व नीच राजकारणामुळे राजीनामा द्यावा लागला. म्हणून शिवसैनिकच नव्हे तर महाराष्ट्रातील सामान्य जनताही संतप्त झाली.

मा. उद्धवजी ठाकरे यांचे 'वर्षा ते मातोश्री' प्रवासादरम्यान मुंबईत ठिकठिकाणी त्यांचे शिवसैनिकांनी आणि मुंबईकरांनी फुले उधळत त्यांच्या स्वाभिमानाला सलाम ठोकला. गद्दारांनी पक्ष संपवायचा विडा उचलला. या कठीण प्रसंगी उद्धवजी डगमगले नाहीत. तर पुन्हा लढ्याचा निर्धार केला. मी पुन्हा

शिवसैनिकाला महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री पदावर बसविन असा निश्चय केला. उद्धव ठाकरे हे 'निश्चयाचा महामेरू' आहेत. त्यामुळे ते २०२४च्या विधानसभा निवडणुकीत विधानभवनावर ते भगवा फडकवल्याशिवाय राहणार नाहीत. शिवसेनेची न्यायालयीन लढाई सुरू आहे. शिवसेना विरोधात गेलेल्या निकालामुळे जनतेत रोष निर्माण झाला. जनतेची शिवसेनेविषयी तळमळ, प्रेम पहावयास मिळते. महाराष्ट्राच्या संस्कृतीला न शोभणारे गलिच्छ राजकारण सुरू आहे. त्याला मा. उद्धवजी ठाकरे पुरुन उरणार आहेत.

शिवसेनेच्या या लढाईत लोकाधिकार समिती महासंघाचे कार्यकर्ते-पदाधिकारीही या निर्धाराने सामील आहेत. परिणामाची तमा न बाळगता कंबर कसून लढाईचा मुकाबला करण्यासाठी सज्ज आहेत. शिवसेनापक्षप्रमुख उद्धव ठाकरे जी कामे सांगतील, जी जबाबदारी देतील ती निःस्वार्थपणे, अहोरात्र मेहनत करून पार पाडणार आहेत. आज टवटवीत दिसणाऱ्या लोकाधिकार समिती महासंघाच्या वृक्षाला सुरूवातीस शेकडो कार्यकर्त्यांची आंदोलने, परिश्रम, त्याग आणि एकजुटीचे सिंचन झाले याचे भान समितीच्या कार्यकर्त्यांनी सतत ठेवले पाहिजे.

युवासेनाप्रमुख आदित्यजी ठाकरे यांच्या अभ्यासू व आक्रमक भूमिकेमुळे महाराष्ट्रातील युवा पिढीत नवचैतन्य निर्माण झाले आहे. मुंबई विद्यापीठ सिनेट निवडणुक व पदवीधर मतदार संघातील निवडणुकीसाठी मा. आदित्यजी ठाकरे यांनी भगवा झंझावात निर्माण केला आहे. त्याला लोकाधिकार समिती कार्यकर्त्यांची साथ आहे. दोन्ही निवडणुकीत शिवसेनेचा विजय प्राप्त करण्यासाठी लोकाधिकारचे कार्यकर्ते कटीबद्ध आहेत.

वंदनीय शिवसेनाप्रमुख श्री. बाळासाहेब ठाकरे यांचा आशीर्वाद आणि आदरणीय शिवसेनापक्षप्रमुख श्री. उद्धवसाहेब ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली स्था.लो.स.महासंघाचे अध्यक्ष, शिवसेना नेते व खासदार अनिल देसाई, सरचिटणीस प्रदीप मयेकर, कार्याध्यक्ष आ. विलास पोतनीस, आ. सुनिल शिंदे यांच्या नेतृत्वाखाली महासंघाचे असंख्य पदाधिकारी आणि कार्यकर्ते भविष्यातील संघटनात्मक सर्व जबाबदारी पेलण्यास सज्ज आहेत. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या बहुआयामी, संयमी आणि कुशल नेतृत्वाखाली महाराष्ट्राच्या विधानभवनावर पुन्हा एकदा शिवसेनेचा भगवा फडकवण्याचा निर्धार लोकाधिकारच्या कार्यकर्त्यांनी केला आहे. म्हणूनच लोकाधिकाराचे हे अधिवेशन शिवसेनेच्या विजयाचा शंखनाद करणारे अधिवेशन ठरणार आहे.

(शब्दांकन : योगेंद्र ठाकूर)



# कंत्राटी कामगारांच्या न्याय हक्कासाठी कटीबद्ध!

**प्रदीप मयेकर**
**सरचिटणीस**
**स्थानीय लोकाधिकार समिती महासंघ**

केन्द्र व राज्य सरकारच्या अखत्यारीत असलेल्या सर्व आस्थापनांमध्ये, त्याचप्रमाणे सार्वजनिक उपक्रमांमध्ये, खाजगी उद्योगधंद्यांमध्ये कायमस्वरुपी नोकऱ्यांचे प्रमाण कमी होवून त्याजागी कंत्राटी कामगार नेमण्याची प्रक्रिया सुरु आहे. या देशात सध्याचा कंत्राटी कामगारांचा वर्ग असंघटीत असल्याने त्यांचे शोषण होत आहे व अन्याय करण्याची एकही संधी ठेकेदार सोडत नाही. कंत्राटी कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांच्या फारच थोडया संघटना कार्यरत आहेत, परंतु त्यांची कार्यशैली व विश्वासर्हता सतत वादातीत राहिली आहे. स्थानीय लोकाधिकार समिती महासंघाने गेल्या ६ ते ७ वर्षांपासून कंत्राटी कामगारांच्या ज्वलंत प्रश्नावर आवाज उठवून जाणीवपूर्वक लक्ष घालण्यास सुरुवात केली आहे. त्यासाठी कंत्राटी कामगारांच्या रितसर संघटनांची नोंदणीही करण्यात आली आहे या कामगारांचे प्रश्न कामगार कायद्यांनुसार सोडविण्यास महासंघ आतापर्यंत यशस्वी झालेला आहे. यात न्युक्लिअर पॉवर कॉर्पोरेशन, ओएनजीसी, इंडियन ऑईल, स्टँडर्ड चार्टर्ड बँक, टाटा कॅन्सर हॉस्पिटल, फिशरीज, भाभा अटॉमिक रिसर्च सेंटर, एचपीसीएल, यासारख्या अनेक कंपन्यांचे कंत्राटी कामगार आहेत महासंघाकडे मोठ्या अपेक्षेने या समस्या घेवून येणाऱ्या कामगारांची संख्या दिवसेदिवस वाढत आहे महासंघाच्या माध्यमातून त्यांना पूर्ण न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न महासंघाचे पदाधिकारी करीत असतात महासंघ या कामगारांच्या प्रश्नांची सोडवणूक तर करतेच व त्यांना कामगार कायद्यांबददल सजग करुन व प्रशिक्षित केले जाते. खालील कामगार कायद्यांचे ज्ञान व जाण कंत्राटी कामगारांना असणे अत्यंत आवश्यक आहे.

- <u>कंत्राटी कामगार नियमन व निर्मुलन कायदा, १९७०</u>: हा कायदा कंत्राटी कामगारांच्या रोजगारावर नियंत्रण ठेवून कामगारांचे शोषण रोखण्याचे काम करतो व कंत्राटी कामगारांना जास्तित जास्त सुविधा प्रदान करणे हा या कायद्याचा उददेश आहे.
- <u>किमान वेतन कायदा, १९४८</u> : ह्या कायद्यानुसार कामगारांना किमान वेतन देणे अनिवार्य आहे. किमान वेतनाचे दर, वर्षातून दोनदा १ एप्रिल व १ ऑक्टोबर रोजी राज्य व केन्द्र सरकार घोषित करते.
- <u>वेतन देय कायदा, १९३६</u>: ह्या कायद्यानुसार कंत्राटी कामगारांना प्रत्येक महिन्याच्या ७ अथवा १० तारखेपर्यंत मासिक वेतन देणे बंधनकारक आहे. त्याचप्रमाणे त्याच्या मासिक वेतनातून अनधिकृत (illegal) कपात करण्यास हा कायदा विरोध करतो.
- <u>समान मोबदला कायदा</u>: ह्या कायद्यानुसार पुरुष महिला यांना समान कामाबद्दल समान वेतन देणे बंधनकारक आहे.
- <u>सामाजिक सुरक्षा कायदा</u>: या कायद्यानुसार कंत्राटी कामगारांना भविष्य निर्वाह निधी, ग्रॅज्युईटी, कर्मचारी राज्य विमा व इतर कल्याणकारी योजनांअंतर्गत वैद्यकीय सुविधा देणे बंधनकारक आहे.
- <u>संघटना (Union) युनियन बनविण्याचा अधिकार</u>: या कायद्यानुसार कामगार आपली संघटना स्थापन करुन संघटनेद्वारे आपल्या न्याय्य व योग्य मागण्यांसाठी मागणीपत्र सादर करुन वाटाघाटी करु शकतात.
- कामगारांचे मासिक वेतन बँकेत जमा करणे बंधनकारक आहे व त्यासाठी कामगार कायदा आहे.
- वर्षाला १८ किंवा २१ दिवसांची रजा देणे बंधनकारक आहे.
- केंद्र सरकारच्या कायद्यानुसार प्रजासत्ताक दिन (२६ जानेवारी), स्वातंत्र्यदिन (१५ ऑगष्ट), महात्मा गांधी जयंती (२ ऑक्टोबर) या दिवशी राष्ट्रीय सुट्टी जाहिर केलेल्या असून या दिवशी काम केल्यास दुप्पट वेतन

देणे बंधनकारक आहे.

- वेतन चोरीः सर्रास कामगारांना ओव्हरटाईमचे वेतन नाकारले जाते. सलग सहा दिवसांनंतर सातव्या दिवशी अथवा कामाच्या ८ तासांनंतर काम केल्यास कायद्यानुसार दुप्पट वेतन देणे बंधनकारक आहे.
- कामगारांना कामाच्या ठिकाणी काम करताना सुरक्षा उपकरणे पुरवणे बंधनकारक आहे. उदा, हेल्मेट, हातमोजे (Gloves), सेफ्टी शूज, गॉगल, सेफ्टी बेल्ट इत्यादी.
- कामगारांना ESIC अंतर्गत सरकारकडून वैद्यकीय सुविधा दिली जाते, परंतू असे निर्दशनास येते कि, कामगारांचे ESIC अंतर्गत पैसेच कापले जात नाहीत व ठेकेदारही पैसे भरत नाहीत सबब या योजनेचा लाभ मिळत नाही.

**कंत्राटी कामगारांच्या समस्या :**

- कामगारांना कोणतीही सूचना न देता वा खोटे आरोप करुन मासिक वेतनातून रक्कम कापली जाते वा कामगारांना तुटपुंजी रक्कम कर्जाच्या रुपाने देवून कमी पगारात काम करुन घेतले जाते. यालाच यालाच आपण वेठबिगारी म्हणतो. या दिलेल्या कर्जाचा हिशोबही ठेवला जात नाही व कामगाराची फसवणूक होते.
- आज कंत्राटी कामगारांना नोकरीची शाश्वती / हमी नाही ठेकेदार बदलला की कामगारांना काढून टाकले जाते. अश्या वेळी त्याचा पगार, भविष्य र्निवाह निधीची रक्कम नाकारली जाते, परंतु महासंघाच्या माध्यमातून अनेक कंपन्यांत आता ठेकेदार बदलल्यावरसुध्दा कामगारांना काढू दिले जात नाही. त्यांना नविन ठेकेदारीत समाविष्ट केले जाते.

आजकाल एक अनिष्ट प्रथा ठेकेदाराकडून अवलंबिली जाते. सर्व कंत्राटी कामगारांची ATM कार्डे ठेकेदार स्वतःकडे ठेवून पगाराच्या दिवशी पगार कामगाराच्या खात्यात जमा केल्यानंतर ATM कार्डाद्वारे ठेकेदार पगारातून रु. ३०००/- ते रु ५०००/- पर्यंत रक्कम परत काढून घेतो. असा प्रकार NPCIL तारापूर, IOCL, HPCL, माझगाव डॉक व इतर अनेक कंपन्यांत चालत होता. परंतु महासंघाच्या माध्यमातून रितसर पोलिस तक्रार करुन कंत्राटी कामगारांना पूर्ण वेतन मिळवून देण्यात महासंघ यशस्वी झालेला आहे.

आज 'अ ' दर्जा असलेल्या शहरात किमान वेतन रु. २१०००/- पेक्षा जास्त आहे व त्यामुळे बोनस, ESIC आदी सुविधांची मर्यादा ओलांडली गेली आहे. सदर सुविधांसाठीची कमाल मर्यादा रु. २१०००/- आहे. हि कमाल मर्यादा पार केल्यामुळे कामगारांना ठेकेदार बोनस व ESIC ची सुविधा नाकारत आहेत. यासाठी केन्द्र सरकारकडे हि कमाल मर्यादा रु. ३५०००/- पर्यंत वाढविण्यासाठी कामगार संघटना प्रयत्न करीत आहेत. यासाठी आपल्या शिवसेना संघटनेकडून मोठे आंदोलन उभारले जाणार आहे.

शिवसेना प्रणित स्थानीय लोकाधिकार समिती महासंघ कंत्राटी कामगारांच्या तक्रारी सोडविण्यास व त्यांना न्याय मिळवून देण्यात महत्वपूर्ण भुमिका बजावित आहे. कामगार कायद्यातील तरतुदींची प्रभाविपणे अंमलबजावणी करण्यासाठी महासंघाचे पदाधिकारी सातत्याने प्रयत्नशील असतात.

कंत्राटी कामगार क्षेत्राची व्याप्ती खूप मोठी आहे. अशी असंख्य क्षेत्रे आहेत की तेथील कंत्राटी कामगारांना कोणी वालीच नाही. या क्षेत्रात कामगारांचे होणारे शोषण कमालीच्या टोकाचे असून, अपुऱ्या पगारामुळे या कंत्राटी कामगारांचे जीवनमान उंचावू शकत नाही, ते मुलांना प्राथमिक शिक्षण देण्यास वा आवश्यक वैद्यकिय सुविधा देण्यास असमर्थ असतात. या क्षेत्रात निःस्वार्थीपणे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची खूपच गरज आहे. आणि महासंघाची चळवळ हि सुशिक्षित कार्यकर्त्यांची असल्याने कंत्राटी कामगारांना योग्य न्याय व न्याय्य हक्क मिळवून देण्यासाठी महासंघातूनच युनियनचे नेतृत्व केलेले कार्यकर्ते उपलब्ध होवू शकतात यावर माझा विश्वास आहे हे आव्हान समर्थपणे पेलून कंत्राटी कामगारांना त्यांचे न्याय्य हक्क मिळवून देण्यासाठी आम्ही महासंघाचे सर्व कार्यकर्ते कटीबध्द आहोत.

## लोकाधिकार चळवळीतील लढ्याचे काही महत्त्वाचे टप्पे...

**भविष्य निर्वाह निधी आयुक्तांची दहशत मोडून काढली :** मराठी कर्मचाऱ्यांच्या अन्यायाविरोधात दाद मागण्यासाठी १९ नोव्हेंबर १९८७ला आयुक्त महेशकुमार भाडा यांची दालनात भेट ठरली होती. परंतु ती त्याने नाकारली. मग शिवसैनिक, कार्यकर्त्यांनी धडक दिली आणि केबिनमध्ये घुसून 'शिवसेना स्टाईलने' धडा शिकवला. भविष्य निर्वाह निधीच्या कर्मचाऱ्यांसमोर त्याला उठाबशा काढायला लावल्या. महासंघाने महेशकुमार भाडाच्या दमन शक्तीचा संपूर्ण बिमोड केला.

**आर.सी.एफ.मधील वर्माच्या वर्मी घाव घातला :** २००० साली दिपककुमार वर्मा या बिहारी माणसाने व्यवस्थापकीय संचालकपदाची सुत्रे हाती घेतल्यापासून आर.सी.एफ. मधील मराठी कर्मचाऱ्यांना डावलून बढत्यांमध्ये बिहारींना प्राधान्य दिले. महासंघाने आर.सी.एफ.वर मोर्चा नेला. कार्यकर्त्यांचा व मोर्चाचा रुद्रावतार पाहून घाबरून दिपककुमार वर्माने मागच्या दाराने पळ काढला. परंतु त्याने सूडबुद्धीने महासंघाच्या प्रदीप मयेकर, अनिल देसाई, वामन भोसले. अनिल चव्हाण आदींवर केसेस टाकल्या. परंतु महासंघाच्या प्रखर आंदोलनामुळे वर्माची खुमखुमी उतरली आणि आर.सी.एफ.मधील तरुणांच्या नोकरभरतीचा मार्ग सुकर झाला.

**१९९४ साली खादी ग्रामोद्योग मंडळातील नवलकिशोर शर्माची रग उतरवली :** "मी शिवसेनेला ओळखत नाही, लोकाधिकार समिती मला माहीत नाही." अशी उद्दामपणाची भाषा नवलकिशोर शर्माने वापरली. मग कार्यकर्त्यांचे पित्त खवळले आणि शर्माला 'शिवसेना' कायमची लक्षात राहील अशी 'ओळख' दाखविली. शर्माची रग उतरवली. त्याचा परिणाम नोकरभरती व बदली प्रक्रिया न्याय्य पद्धतीने होऊन मराठी तरुणांना व कर्मचाऱ्यांना न्याय मिळाला.

**रेल्वे रिक्रुटमेंट बोर्डाची अरेरावी थांबवली :** मराठी तरुणांना डावलून उत्तरप्रदेश, बिहारी तरुणांची भरती रेल्वेत जोरदार सुरू होती. त्याविरोधात १८ नोव्हेंबर २०१३ रोजी रेल्वे रिक्रुटमेंट मंडळाच्या मुंबई सेंट्रल कार्यालयावर समितीच्या कार्यकर्त्यांनी मोर्चा नेला. महासंघाचे अनिल देसाई, रमेश पालांडे, आदींवर केसेस दाखल झाल्या. २५ मे २००३ रोजी रेल्वे रिक्रुटमेंट बोर्डाची खलाशी (चतुर्थ श्रेणी) या पदासाठी होणाऱ्या गैरकारभाराला आळा बसावा म्हणून महासंघाने रेल्वे रिक्रुटमेंटची परीक्षाच उधळून लावली. रमेश गवळी, अरुणकुमार दुबे हेही लढ्यात अग्रसेर होते.

**ओ.एन.जी.सी.तील उत्तर भारतीय लॉबीच्या लबाडीला वेसण घातले :** कायद्याची कुठलीही तमा न बाळगता ओ.एन.जी.सी.तील नॉर्थ इंडियन अधिकाऱ्यांची लॉबी नोकरभरतीत मराठी उमेदवारांवर अन्याय करीत होती. त्यांचा वाढता मुजोरपणा उतरवण्यासाठी मे १९८२ मध्ये लोकाधिकार महासंघाने शिवसेना नेते मनोहर जोशी, महासंघाचे अध्यक्ष सुधीरभाऊ जोशी यांच्या नेतृत्वाखाली मेकर्स टॉवरवर मोर्चा नेला. शिवसैनिकांच्या घोषणांनी संतप्त होऊन केबिनच्या बाहेर येऊन अर्वाच्य भाषेत बोलू लागला. मग कार्यकर्त्यांचा पारा अनावर झाला आणि मग तिथल्या अधिकाऱ्यांना या उर्मटपणाची किंमत मोजावी लागली. ६ सप्टेंबर १९८२ रोजी माननीय शिवसेनाप्रमुख श्रीमान बाळासाहेब ठाकरे यांच्या उपस्थितीत ओ.एन.जी.सी.मध्ये अधिकृतपणे स्थानीय लोकाधिकार समितीची स्थापना प्रदीप मयेकर यांच्या नेतृत्वाखाली झाली.

**एअर इंडियातील मुलाखती उधळून लावल्या :** एअर इंडियामध्ये हवाईसुंदरी, फ्लाईट पर्सर, ऑफीस असिस्टंट या जागांसाठी १९८८ साली भरती जाहीर झाली. मराठी तरुण-तरुणी लोकाधिकारच्या प्रशिक्षण वर्गामुळे मोठ्या प्रमाणात लेखी परीक्षा उत्तीर्ण झाले होते. परंतु मौखिक परीक्षेत त्यांना डावलून

अमराठी तरुण-तरुणींना भरती करण्याचा प्रयत्न व्यवस्थापन करीत होते. लोकाधिकार महासंघाने मोर्चा काढून त्यांचा कुटील डाव उधळून लावला.

**एअर इंडियातील ३५० कंत्राटी कामगारांना दिलासा :** एअर इंडियाची उपकंपनी असलेल्या एअर इंडिया एअर ट्रान्सपोर्टमध्ये नोकरभरतीत जाचक अटींमुळे स्थानिक उमेदवारांवर अन्याय होत होता. याबाबत शिवसेनेने केलेल्या पाठपुराव्यामुळे जाचक अटी रद्द करण्यात आल्या. नंतर १० जानेवारी २०११ पासून नोकरभरती सुरू केली. लोकाधिकारचे उल्हास बिले आदी पदाधिकाऱ्यांनी दिलेल्या लढ्याला यश आले.

**सेंट्रल बँकेच्या अध्यक्षांची घमेंड उतरवली :** २००७ मध्ये सेंट्रल बँक शिपाई कर्मचाऱ्यांचा प्रश्न चर्चेच्या सनदशीर मार्गाने सोडविण्यासाठी जेव्हा स्था.लो. समिती महासंघाचे अध्यक्ष गजानन कीर्तिकर, खासदार आनंदराव अडसूळ, सरचिटणीस अनिल देसाई, वामन भोसले आदी गेले तेव्हा या पदाधिकाऱ्यांच्या शिष्टमंडळाला उर्मट उत्तरे देणाऱ्या अध्यक्षांची घमेंड महासंघाने उतरवली. पदाधिकाऱ्यांचे उग्ररुप पाहून 'तुम्ही लेखी निवेदन द्या, मी लक्ष घालीन' असे आश्वासन दिले आणि मग मार्ग सुकर झाला.

**महानगर टेलिफोन निगम :** १९८४ साली महानगर टेलिफोन निगममध्ये लोकाधिकाराची समितीची स्थापना झाली. खा. अरविंद सावंत यांच्या नेतृत्वाखाली मराठी तरुणांना महानगर टेलिफोन निगममध्ये नोकरी मिळावी म्हणून लढा दिला. मराठी टक्का वाढवला. कर्मचाऱ्यांना कामगार महासंघाच्या माध्यमातून पेन्शन व इतर सवलती मिळवून दिल्या. दिलीप जाधव, प्रकाश शिरवाडकर, बाळा साटम, संजय ढोलम आदी पदाधिकाऱ्यांनी चळवळीत झोकून दिले.

**प्रॉव्हिडंट फंड** कार्यालयातील नोकरभरतीच्या प्रक्रिया यादीत मराठी टक्का जेव्हा समितीला कमी दिसला तेव्हा समितीचे पदाधिकारी सुभाष भोसले यांनी सहकाऱ्यांसह आंदोलने केली. आंदोलनकर्त्या कार्यकर्त्यांची व्यवस्थापनाने आकसाने चंद्रपूरला बदली केली. त्याविरुद्ध समितीने लढा दिला.

**विजया बँकेतील** २६ कर्मचारी १४ वर्षे हंगामी कर्मचारी म्हणून काम करत होते. समितीच्या लक्षात आल्यावर त्यांनी लढा दिला आणि त्या २६ हंगामी कर्मचाऱ्यांना कायम केले.

**महाराष्ट्रातील पोस्टमन भरतीसाठी** महाराष्ट्रातील मराठी लोकांचीच भरती करण्यासाठी समितीचे पदाधिकारी अजय माने आदींनी लढा दिला आणि यशस्वीही केला. लोकाधिकारच्या काही पदाधिकाऱ्यांना अटक झाली. तुरुंगवास देखील झाला. परंतु त्यांनी एका निर्धाराने खचून न जाता लढा दिला आणि यशस्वीही केला.

रिलायन्स स्था. लो. समितीचे अध्यक्ष श्री. प्रदीप मयेकर यांच्या मार्गदर्शनाखाली व सरचिटणीस श्री. प्रदीप बोरकर यांच्या नेतृत्वाखाली अदाणी इलेक्ट्रिसिटी आस्थापनातील जवळ जवळ १२०० कंत्राटी कामगारांना कायमस्वरूपी नोकरीत स्थान मिळाले

बी. एस. ई. एस. आस्थापनातील अमराठी अधिकाऱ्यांच्या नोकरभरती विरोधात स्था. लो. समिती महासंघाने कंपनीचे चेअरमेन श्री. आर. वि. शाही. यांना घेराव घालून प्रसाद दिल्यानंतर सदर भरती रद्द करून मराठी उमेदवारांना प्राधान्य देण्यात आले.

# लोकाधिकार

५० सुवर्ण महोत्सवी वर्ष

स्थानीय लोकाधिकार समिती महासंघ - एक धगधगती चळवळ




- नोकर भरतीत मराठी माणसांना १०० टक्के प्राधान्य, या ज्वलंत मागणीचा सातत्याने पाठपुरावा करणाऱ्या शिवसेना प्रणित स्थानीय लोकाधिकार समिती महासंघाचा विजय असो !
- लक्षात ठेवा पुरते पक्के, मराठी माणूस १०० टक्के !
- कोण म्हणतो देणार नाही, घेतल्या शिवाय राहणार नाही !
- मराठी माणसाच्या न्याय हक्कासाठी लढणाऱ्या शिवसेनेचा विजय असो !

**हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख वंदनीय बाळासाहेब ठाकरे झिंदाबाद !**
**शिवसेनापक्षप्रमुख आदरणीय उद्धवसाहेब ठाकरे आणि**
**शिवसेना नेते युवासेनाप्रमुख माननीय आदित्यजी ठाकरे यांचा विजय असो !!**

श्री. प्रदीप मयेकर, सरचिटणीस यांनी स्थानीय लोकाधिकार समिती महासंघाच्या अधिवेशनानिमित्त शिवसेना भवन, दादर, मुंबई- येथून प्रकाशित केले. प्रकाशन दिन ११ फेब्रुवारी २०२४.
(फक्त खाजगी वितरणासाठी)